ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# अध्ययन अक्षम विद्यार्थ्यासाठी खेळावर आधारित अध्ययनाची आवश्यकता

**श्रीमती देसले चित्रलेखा निलकंठ**
Ph.D.Registration
केंद्र
आदर्श बी.एड्.कॉलेज पुणे

## प्रस्तावना

प्रत्येक व्यक्तिच्या जीवनातील सर्व शिक्षणाचा पाया प्राथमिक शिक्षण असतो. जर प्राथमिक शिक्षण दर्जेदार मिळाले तर विद्यार्थी पुढील शिक्षणात चांगल्या प्रकारे यश मिळवू शकतो. पण प्राथमिक शिक्षणअ घेत असतानाच कोणअत्यातरी एखादया कारणाने विद्यार्थी मागे पडला तर तो कायम मागे राहतो व त्याचे अध्ययन परिणामकारक घेवू शकत नाही. विद्यार्थ्याच्या शिकण्यास मदत करणे हे शिक्षकाचे प्रमुख कार्य आहे. संपूर्ण शिक्षण प्रक्रियाच बालकाच्या अध्ययनाशी जोडलेली असते. शिक्षकाने आपल्या वर्गातील अध्ययनात मागे असणारी विद्यार्थी निवडून त्यांना विशेष सराव, विशेष लक्ष व परिणामकारक मार्गदर्शन देवून त्यांना सामान्य विद्यार्थ्यांबरोबर आणणे हे आपले कर्तव्य समजले पाहिजे. वर्गात सर्व साधारणपणे हुशार समजल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडे शिक्षक अधिक लक्ष देवून आपले अध्यापन करतात. त्यामुळे अध्ययनात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार केला जात नाही व तो विद्यार्थी अधिकाधिक मागे पडत जातो.

### अध्ययन प्रक्रियेचा अर्थ

शाळेतील एखादया वर्गाचे निरीक्षण केले तर आपणास त्या वर्गात चालणाऱ्या विविध कृती दिसतील. उदा.शिक्षकाचे शिकविणे, विद्यार्थ्यांचे लक्षपूर्वक ऐकणे, एखादी गोष्ट पाहून माहिती मिळविणे, मित्रांशी चर्चा करणे, आकृती काढणे, प्रयोग करणे या व अशा अनेक कृतीतून विद्यार्थी अनुभव मिळवीत असतात आणि शिकत असतात. अध्ययन म्हणजेच शिकणे होय. शिकल्यामुळे व्यक्तिच्या वर्तनात काही ना काही अपेक्षित बदल घडून येत असतो. म्हणून ‘अध्ययन’ या संज्ञेच्या खालीलप्रमाणे व्याख्या करता येतील.

१.‘प्रशिक्षणाने अथवा सरावाने वर्तनात परिवर्तन होणे म्हणजे अध्ययन.’

२.अध्ययन म्हणजे व्यक्तिने आपल्या वर्तनामध्ये अनुभवामुळे घडवून आणलेले टिकाऊ स्वरूपाचे बदल होय.

३.अध्ययन म्हणजे शिकणे किंवा आत्मसात करणे.

४.अध्ययन म्हणजे अनुभव व वर्तन यामधील सुधारणा होय.

### अध्ययन अक्षम विद्यार्थी

अध्ययन अक्षमता - वाचन, लेखन किंवा गणन यात कोणत्याही कारणाने येणारे अडथळे होय. अव्यक्तिला सहजासहजी अध्ययन करता येत नसेल, अध्ययनाचा वेग सर्वसामान्यांपेक्षा कमी राहत असेल तर त्याच्या या उणिवेस अध्ययन अक्षमता असे म्हणता येईल.

अध्ययन प्रक्रियेत येणारे अडथळे म्हणजे अध्ययन अक्षमता होय.

"A learning disability is a neurological disorder. I simple terms, a learning disability results from a difference in a way a person's brain is wired! Children with learning disability are as smart as or smarter than their peers. But they may have difficulty reading, writing, spelling, reasoning, recalling and organizing information if left to figure things out by them or it taught in conventional ways."

कोणत्याही वर्गात साधारण विद्यार्थ्याच्या मागे पडणारी, त्या वर्गाच्या अपेक्षित अध्ययन क्षमता गाठू न शकणारी विद्यार्थी म्हणजे अध्ययन अक्षम विद्यार्थी होय. असे विद्यार्थी वर्गात अपेक्षित समजले जातात. शिक्षक अशा विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून न घेता किंवा त्यांना अध्ययन प्रक्रियेत बरोबर न घेता पुढे जातात. वार्गातील हुशार समजल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांकडे शिक्षक अधिक लक्ष देतात. त्यांचा विचर करून अध्यापन प्रक्रिया सुरू ठेवतात. वास्तविकपणे अध्ययनात मागे राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकाची जास्त गरज असते. त्यांनाच विशेष मदतीची व मार्गदर्शनाची गरज असते. जर अशा विद्यार्थ्यांना जास्त लक्ष देवून त्यांच्या गरजा लक्षात घेवून शिक्षकांनी अध्यापन केले तर त्यांना अध्ययनात प्रगती करण्यास मदत होईल. अशा विद्यार्थ्यांच्या समस्या किंवा कोणत्या प्रकारे मार्गदर्शनाची त्याला गरज आहे हे समजून घेवून शिक्षकाने त्याला अध्यापन करावे. खरे तर प्रज्ञावान विद्यार्थ्याप्रमाणेच अध्ययन अक्षम विद्यार्थ्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कारण त्या मार्ग दर्शनामुळे तो विद्यार्थी त्याच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करू शकतो.

अध्ययन अक्षमता ही कोणत्याही कारणाने येवू शकते.

१. अनुवंशिकता

२. निकृष्ट शरीर संवेदनशीलता.

३. दृष्टी व हालचालीचे संघटन वांधण्याची निकृष्ट क्षमता

४. दृष्टीदोष

५. विविध ज्ञानेंदियाकडून होणारे ज्ञानाचे संघटन

६. घटनाचा किंवा माहितीचा क्रम लक्षात न घेणे

७. विशिष्ट ताल किंवा लयींचे अज्ञान

८. संवोधन निर्मिती होणयामध्ये होणारे अडथळे

९. अध्ययन शैलीमध्ये येणाऱ्या समस्या

१0 . सामान्यज्ञान व व्यवहार ज्ञानातील त्रुटी

११ . परिस्थितीजन्य कारणे

१२ . आर्थिक किंवा सामाजिक कारणे

१३ . अध्ययनास योग्य वातावरण नसणे

१४ . योग्य शिक्षकाचा अभाव

अधयन अक्षम विद्यार्थी हे मतीमंद नसतात. तर ते कोणत्या तरी कारणामुळे अध्ययनात मागे राहतात. अल्वर्ट आईनस्टाईन हा वयाच्या नवव्या वर्षापर्यंत वाचू शकत नव्हता. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ थॉमस अल्व्हा एडिसन हे त्या काळात अध्ययन अक्षम विद्यार्थी म्हणून ओळखले जात होते. व या कारणामुळे त्यांना शाळेतून काढून टाकले होते. अशा काही महान व्यक्ति आहेत की, ज्या त्यांच्या लहानपणी अध्ययन अक्षम या समस्येने ग्रासलेल्या होत्या पण योग्य त्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे त्या त्यांच्या कार्यक्षेत्रात सर्वोच्च पदावर विराजमान झाल्या.

**अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांची वैशिष्टये**

"The World federation of Neurology defines dyslexia as a disorder manifested by difficulty in learning to read despite conventional instruction. It is a brain based type of learning disability that specifically impairs a person's ability to read."

१. अध्ययन अक्षम विद्यार्थी सामान्य विद्यार्थ्याप्रमाणे वाचन व लेखन करू शकत नाही.

२ . एकदा अध्ययन केलेल्या गोष्टी पुन्हा स्मरण करताना खुप अडथळे येतात. (लक्षात राहत नाही)

३ . अशा विद्यार्थ्यात न्यूनगंड असतो.

४ . नेतृत्त्व कौशल्याचा अभाव

५ . आत्मविश्वासाचा अभाव

६ . स्व अस्मिता कमी असतो.

७ . अवध्आन स्थिर नसते. त्यामुळे प्रगती मंद गतीने होते.

८ . सामाजिक ठिकाणी परिस्थितीशी जुळवून घेवू शकत नाही.

९ . काही मुलांच्या भाषा विकसित न होणे.


१0 . कामाच्या नियोजनाचा अभाव.

११ . नवीन वातावरणाशी जुळवून घेण्याची समस्या.

१२ . साध्या व सोप्या गोष्टी करतांना अडचणी येवू शकतात .

१३ . उदासीन वृत्ती असते . अभ्यासात व खेळात लक्ष नसते .

१४ . आकलन क्षमतेचा अभाव .




**अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी खेळातून अध्ययन**

प्राथमिक स्तरावरील बालकाचा अध्ययनात शैक्षणिक व सामाजिक समस्या निर्माण झाल्यामुळे त्याची अध्ययन पातळी ही किमान पातळीपेक्षा कमी राहते . अशा विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक शिक्षणाला पर्याय नाही .

**उपचारात्मक अध्यापनाची तंत्रे**

श्रवण, भाषण, संभाषण, प्रकटवाचन, पाठांतर, लेखन, कृती अथवा उपक्रमांचा सराव इ .

**उपचारात्मक अध्यापनाचे नियोजन**

प्रथम अशा विद्यार्थ्यांना काय-काय येते याची माहिती करून घेणे व पुढील घटक शिकण्यासाठी त्याला काय अडचणी येतात, त्याच्या शैक्षणिक गरजा काय आहेत याचा अभ्यास करणे शिक्षकासाठी आवश्यक आहे. सोप्याकडून अवघडाकडे व ज्ञाताकडून अज्ञाताकडे या तंत्राचा वापर करून त्यांना पुढील अध्ययन अनुभव देणे.

**खेळातून अध्ययन**

१. गट पद्धतीचा वापर करणे.

२. स्वयंअध्ययन कार्डाचा वापर करणे.

३. अध्ययनासाठी शैक्षणिक साधनांचा भरपूर वापर करणे. शब्दपट्टया, शब्दकार्ड, अक्षर चंडू, जमिनीवर ऑईलपेन्टने मूळाक्षरे लिहिणे, शब्दसराव, खडे किंवा वाळूने जमिनीवर मूळाक्षरे तयार करणे, मेहंदीच्या कोनने त्यांच्या हातावर मूळाक्षरे लेखन करणे, लहान-लहान खेळातून अध्ययन घडवून आणणे. उदा. शब्दभेंडया, अक्षरभेंड्या, अक्षरे जोडून शब्द वाक्य तयार करणे, शब्दकोडी सोडविणे, गोष्ट ऐकणे व स्वतःच्या भाषेत सांगता येणे.

४. पालकांची भेट घेवून त्यांचे योग्य तेथे सहकार्य घेणे.

५. खालीलप्रमाणे खेळ घेता येतील -

१. प्रत्येक विद्यार्थ्याकडे एक-एक शब्द कार्ड देणे. त्यावरून ते वाक्य तयार करतील.

२. धरणांची नावे, पुलांची नावे, गावांची नावे, मुलांची नावे, वस्तूंची नावे, फुलांची नावे, फळांची नावे, प्राणी-पक्ष्यांची नावे, नदयांची नावे यांचे कार्ड प्रत्येक मुलांकडे देणे व कोणतेही नाव शिक्षक घेतील त्या मुलाने पुढे यावे. तसेच एखादया मुलाला इतर नावे ओळखता यावीत. सर्वांच्या नावाचे वाचन करावे. याप्रमाणे वाचन सराव घेता येईल.

६. लेखन सरावासाठी मूळाक्षरे गिरविणे, अक्षर लेखन व शब्द लेखन सरावासाठी विविध खेळ घेणे.

७. शिक्षकांनी स्वतः विसरून विद्यार्थ्याप्रमाणेच होवून त्यांना न कळत मार्गदर्शन करणे व त्यांना प्रोत्साहन देवून आत्मविश्वास वाढविणे महत्त्वाचे आहे.

अशाप्रकारे अध्ययन अक्षम विद्यार्थ्यासाठी अनेक प्रकारचे खेळ घेता येतील.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. आंदळकर, ज. ज्ञा., अभिनव शैक्षणिक मानसशास्त्र, श्रीलेखन वाचन भांडार, पुणे.

२. करंदीकर, सुरेश, शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. पारसनीस, न. रा. (२००८). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.